**ग्रामपंचायत भेंडी तालुका कळवण जिल्हा नाशिक मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत यशस्वी होण्यासाठी लोकसभागह महत्त्वाचा. त्या अनुषंगाने 350 ग्रामस्थांचा अभियानात सहभाग.**







**ग्रामपंचायत भेंडी तालुका कळवण जिल्हा नाशिक मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत यशस्वी होण्यासाठी लोकसभागह महत्त्वाचा. त्या अनुषंगाने 350 ग्रामस्थांचा अभियानात सहभाग.**

तसेच किड्स लर्निंग स्कूल व जि. प. प्राथमिक शाळा भेंडी येथील विद्यार्थ्यांनी हजर राहून स्वच्छता अभियान राबविले व सरकारी योजनांवर अवलंबून न राहता ग्रामीण लोक स्वतःच्या विकासा साठी जबाबदारी घेऊन सामुदायिक काम करत आहे. त्या अंतर्गत आज दिनांक 26/11/2025 रोजी ग्रामपंचायत अंतर्गत अभियान यशस्वीरित्या राबविण्यात आले असून भेंडी ग्रामपंचायत अंतर्गत चार जेसीबी, ट्रॅक्टर 24, दोन पांदन रस्ते व खंडेराव महाराज आणि चिंतामणी महाराज स्मशानभूमी व एकलव्य नगर ग्रामपंचायत भेंडी येथे श्रमदानासाठी  रस्ते तयार करण्यात आले आहेत. तसेच लोकसभागातून दोन लाख रुपये ग्रामपंचायतीस देण्यात आले आहेत. उपस्थित सरपंच किशोर ठाकरे, उपसरपंच विजय रौंदळ, ग्रामपंचायत अधिकारी राजाराम सखाराम खांडवी, माजी उपसरपंच योगेश रौंदळ, ग्रामपंचायत सदस्य शांताराम वाघ, सदस्य गायत्री पवार सिंधुबाई साळवे, माजी उपसरपंच शेतकरी तालुका संघटना अध्यक्ष विलास रौंदळ, गावातील उपस्थित नागरिक, शेतकरी आत्माराम रौंदळ, मनोहर रौंदळ, शरद पुंडलिक रौंदळ, बाळासाहेब रौंदळ, भास्कर रौंदळ,  विनोद मोरे, प्रशांत मोरे, नागेश मोरे, किरण रौंदळ, तुषार रौंदळ, अनिल रौंदळ, बाबाजी पवार, संदीप वेशी, नानाजी मोहन रौंदळ, भाऊसाहेब रौंदळ, गोरख बोरसे तसेच सर्व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते. गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन पालक अधिकारी गायकवाड साहेब यांनी केले. संपूर्ण माहिती खांडवी भाऊसाहेब यांनी दिली आणि तसेच ग्रामपंचायत कडून आव्हान करण्यात आले कि आपल्या घरापासून साफसफाई नियमित करत रहा आणि घरपट्टी-पाणीपट्टी नियमित भरत रहा.  कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व सगळ्यांचे आभार विलास नाना रौंदळ यांनी केले.

